आपले बालपण सोडणे
किती कठीण असते, नाही का?

स्वस्थ बसावे, डोळे मिटावे,
आजचे वास्तव मिटून घ्यावे.
शिरावे खुशाल बालपणात
खोलवरच्या आठवणींत

आज नसलेले आई-वडील
तेव्हा घरात असत, दिसत
दूर गेलेले भाऊ-बहिणी
भोवती भिरभिरत असत.

खेळण्याच्या मैदानातच खरे
जगणे होते जिवंत झालेले,
काळ थांबलेला आमच्यासाठी
विश्वच मैदानात सामावलेले

आम्ही सारे त्यातच होतो
तेव्हा आम्हीच आम्ही नव्हतो
डोळयांमध्ये स्वप्नेच स्पप्ने
आणि अंगामध्ये धग होती.

६.१.२०१९